CNR NO – **MHCH090009712023**

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०२.११.२०२३ |
| नोंदणी दिनांक | : | ०२.११.२०२३ |
| निकाल दिनांक | : | १९.०६.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०२ ०७ १७ |

## <u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गोंडपिपरी यांचे न्यायालय, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर</u>

(पिठासीन अधिकारी यु. पी. शिंदे)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७०१/२०२३ निशाणी क्र.१८

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन अधिकारी
पोलीस स्टेशन, गोंडपिपरी,
ता. गोंडपिपरी जिल्हा. चंद्रपूर ....अभियोगपक्ष

-विरुध्द-

तुकेश पत्रु वानोडे
वय- ६५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
रा. करंजी, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर

**......**आरोपी

<u>गुन्हाः मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये</u>

अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ - श्री. आर. बी. धात्रक
आरोपीतर्फे विधिज्ञ - श्री. एम.टी.वानोडे

## <u>न्यायनिर्णय</u>

(घोषीत दिनांक – १९ जुन, २०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुद्ध मोटार वाहन कायदा चे कलम १८५ अन्वये दोषारोप पत्र दाखल आहे.

**०२.** प्रस्तुत प्रकरणात इस्तगाशा क्र./१८१/२०२३ पोलीस स्टेशन, गोंडपिपरी येथे नोंदवून तपास श्री. मनोहर मत्ते यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी आरोपीची ब्रेथ

ॲनालायझर मशीन द्वारे तपासणी केली. साक्षीदारांचे बयाण नोंदवीले व आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०३. माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुद्ध मोटार वाहन कायदा चे कलम १८५ अन्वये गुन्ह्याचा तपशील नि.क्र.१५ वर नोंदविला. आरोपीने प्रतिकथन नाकारल्यामुळे त्याचेविरुद्ध खटला चालविण्यात आला.

०४. या प्रकरणातील अभियोग पक्षाचे कथन व पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता माझे विचारार्थ उपस्थित झाले. ते मुद्दे करण्यात आलेल्या चर्चेवरुन आलेल्या निष्कर्षासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दिनांक २६/०७/२०२३ रोजी १८.३९ वाजताचे दरम्यान मौजा गांधी चौक, गोंडपिपरी, ता. गोंडपिपरी, येथील रोडवर सार्वजनिक ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र. एम. एच.-३४.ए.ए.-६७५५ हे वाहन मदयपान करून ज्याने आरोपीला सदर वाहनावर नियंत्रण ठेवता येणार नाही अशा रितीने चालविले व त्याप्रमाणे मोटार वाहन कायदा कलम १८५ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही |
| ०२. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

कारणमिमांसा

०५. अभियोग पक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता एक पंच साक्षीदार बद्रिनाथ कवडू गेडाम यांना तपासण्यात आला आहे. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवून देखील इतर कुठलाही साक्षदार तपासलेला नाही.

०६. निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०७. अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपी विरूध्द काहीही आलेले नसल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये बयाण वगळण्यात आले.

०८. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

मुद्दा क्र. १ करीता -

**०९.** आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी पक्षाला आरोपीने २६/०७/२०२३ रोजी १८.३९ वाजताचे दरम्यान मौजा गांधी चौक, गोंडपिपरी, ता.

गोंडपिपरी, येथील रोडवर सार्वजनिक ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र. एम. एच.-३४.ए.ए.-६७५५ हे वाहन मदयपान करून ज्याने आरोपीला सदर वाहनावर नियंत्रण ठेवता येणार नाही अशा रितीने चालविले ही बाब सिध्द करणे गरजेचे व आवश्यक आहे.

**१०.** साक्षदार क्र.१ बद्रिनाथ कवडू गेडाम यांना पंच साक्षदार या नात्याने तपासण्यात आलेले आहे. त्यांनी पुराव्यादरम्यान ते आरोपीला आळखत नसून त्यादिवशी काय घटना घडली या बाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे आरोपी हा घटनेच्या दिवशी व ठिकाणी त्याच्या ताब्यातील वाहन हलगर्जिपणाने व निष्काळजीपणे चालविताना मिळून आला हि बाब सिध्द होत नाही.

**११.** याव्यतिरीक्त त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केलेले आहे. सदरहू साक्षिदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी अधिवक्त्यांनी त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले, परंतु त्यातदेखील त्यांनी प्रकरणाच्या दृष्टीने कोणताही महत्वपुर्ण पुरावा आलेला नाही.

**१२.** त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन मदयपान करून ज्याने आरोपीला सदर वाहनावर नियंत्रण ठेवता येणार नाही अशा रितीने चालविले या बाबी फिर्यादीची साक्ष नोंदविण्यात आलेली नसल्यामुळे पुर्णपणे स्पष्ट झालेल्या नाहीत. सबब, फिर्यादीने दिलेली तोंडी तक्रार ही सिद्ध झाली असे म्हणता येणार नाही.

**१३.** अभिलेखावर आलेल्या एकंदरीत पुराव्यांचे, कागदपत्रांचे अवलोकन केले असता, ही बाब प्रकर्षाने जाणवते की, अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षिदाराने आरोपीविरूद्ध कोणतेही भाष्य केलेले नाही. त्यामुळे, बद्रिनाथ कवडू गेडाम यांचा साक्षिपुरावा हा आरोपीविरूद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरीता पुरेसा नाही.

**१४.** अभिलेखावर आलेल्या पुराव्यांचा ऊहापोह करता, दिनांक २६/०७/२०२३ रोजी १८.३९ वाजताचे दरम्यान मौजा गांधी चौक, गोंडपिपरी, ता. गोंडपिपरी, येथील रोडवर सार्वजनिक ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र. एम. एच.-३४.ए.ए.-६७५५ हे वाहन मदयपान करून ज्याने आरोपीला सदर वाहनावर नियंत्रण ठेवता येणार नाही अशा रितीने चालविले ही बाब निःसंशय, शंकेपलीकडे सिद्ध झालेली नाही. करीता, अभियोग पक्ष आरोपीविरूद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप सिद्ध करण्याकरीता असमर्थ ठरला, या निष्कर्षाप्रत मी येऊन पोहोचलो आहे.

१५. फौजदारी कायद्याचे मुळ तत्व लक्षात घेता, आरोपीवरील दोषारोप

संशयापलीकडे शाबीत करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरलेला आहे. भारतीय फौजदारी न्याय प्रक्रियेनुसार, संशय हा नेहमी आरोपीच्या फायद्याचा असतो. तरी, संशयाचा फायदा आरोपीला देणे उचित ठरेल.

१६. उपरोक्त पुराव्यावरुन घटनास्थळावर नेमके काय घडले, याबाबत पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. म्हणून, पुराव्याअभावी सदर प्रकरणात आरोपीविरूद्धचा गुन्हा सिद्ध झालेला नाही. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने मुद्दा क्र.१ च्या बाबतीत नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

मुद्दा क्र. २ करीता -

१७. अभियोग पक्षाने आरोपीविरूद्ध गुन्हा शाबीत करण्यासाठी सबळ, विश्वसनीय व संयुक्तीक पुरावा सदरच्या खटल्यामध्ये आणलेला नाही. त्यामुळे, आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होत नसल्याने तो निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो.

१८. प्रस्तुत प्रकरणाचे आवलोकन केले असता, ही बाब प्रकर्षाने जाणवते की, तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान प्रस्तुत प्रकरणात कोणतीही वस्तु अथवा दस्त जप्त केलेले नाही.

१९. सबब, मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने पुढील अंतीम आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी तुकेश पत्रु वानोडे यांना भारतीय मोटर वाहन कायदा चे कलम १८५ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यांतून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये रुपये १५,०००/- चे बंधपत्र व तितक्याच रकमेचे जामीनपत्र करुन द्यावे, जे अपील कालावधी संपुष्ठात येईपर्यंत वैध राहिल.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

(Sd-)
**(उमाकांत पी. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
गोंडपिपरी.

ठिकाण : गोंडपिपरी
दिनांक : १९/०६/२०२६

## प्र मा ण प त्र

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | उमेश रामप्रसाद आमटे, लघुलेखक श्रेणी-३. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, गोंडपिपरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | १९/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १९/०६/२०२६ |